# स्त्रिया आणि आर्थिक विकास

**आर्थिक, राजकीय व शैक्षणिक अशा सर्वच आघाड्यांवर स्त्रियांची होत जाणारी ही पिछेहाट पाहिली म्हणजे घटनेने दिलेले स्त्री पुरुषांच्या समानतेचे आश्वासन केवळ कागदोपत्रीच राहाणार की काय अशी भीती वाटल्यावाचून राहात नाही.**

खाजगी मालकी आणि स्पर्धा यावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत जे गट आर्थिक, राजकीय व शैक्षणिक दृष्टया पुढारलेले असतात त्यांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होते. देशाच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा त्यांच्याच पदरात पडतो; आणि नव्या नव्या क्षेत्रात पदार्पण करून स्वतःचा अधिकाअधिक विकास करून घेण्याच्या संधी त्यांना प्राप्त होतात. उलट या सर्व दृष्टीनी मागास असणारे गट उत्पादन क्षेत्रातून बाहेर फेकले जातात त्यांच्या संपत्तीचा ऱ्हास होतो. त्यांच्या दारिद्रयात भर पडते आणि उत्पादन साधनांना वंचित झाल्यामुळे ते बेकारीला व उपासमारीला बळी पडतात असाच आतापर्यंतचा अनुभव आहे. स्त्रिया या नियमाला अपवाद नाहीत. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत प्राचीन काळापासून स्त्रिया ह्या एक आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेला गट म्हणून वावरत आलेल्या आहेत. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर त्यांची स्थितीही खालावत गेली तर त्यात काहीच आश्चर्य नाही. भारतातील भांडवलशाहीच्या विकासाचा स्त्रियांवर होणारा परिणाम तपासून पाहिल्यास या निष्कर्षाची सत्यता आपल्या प्रत्यांतरास येईल.

भारतात इंग्रजी राजवटीमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भांडवलशाहीचा उदय झाला. त्यावेळी भारतातील सर्व स्त्रिया सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया एकाच पातळीवर नव्हत्या. आर्यपूर्व लोकसंस्कृती, आर्य संस्कृती आणि मध्ययुगीन मुसलमान संस्कृती अशा अनेक संस्कृतींचा परिपाक होऊन भारतीय संस्कृतीची घडण बनलेली आहे. या तिन्ही संस्कृतींचा भारतातील निरनिराळ्या प्रदेशांवर कमी-अधिक परिणाम झालेला दिसून येतो. आर्यपूर्व संस्कृतीतील अनेक आदिम जमाती मातृप्रधान होत्या. दक्षिणेतील अनेक जातींच्या विचारांत आणि व्यवहारात अद्यापही या मातृप्रधान संस्कृतीचे अवशेष शिल्लक राहिलेले आहेत. याउलट आर्य व मुस्लीम या दोन्ही संस्कृती अधिक पुरुषप्रधान होत्या. आर्यांनी माता, पत्नी किंवा मुलगी या नात्यांनी कुटुंबात स्त्रीला कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. स्त्री ही स्वातंत्र्याललायक नाही अशीच त्यांची धारणा होती. इस्लामने तर स्त्रियांवर गोषाची सक्ती केली. कुटुंबविषयक नागरी कायद्यात स्त्रीपुरुषांच्या समानतेचे तत्त्व समाविष्ट करण्यास अद्यापही भारतातील बहुसंख्य मुसलमानांचा विरोध आहे. उत्तरेकडील सर्व प्रदेशांवर या दोन्ही संस्कृतीचे अधिक दृढ असे संस्कार आहेत. साहजीकच उत्तर भारतातील स्त्रिया दक्षिणेकडील स्त्रियांच्या मानाने अधिक बंधनात अडकलेल्या आहेत. दक्षिणेतही स्त्रियांना स्वातंत्र्य नसले तरी उत्तरेपेक्षा दक्षिणेकडील राज्यात स्त्रिया सामाजिक व्यवहारात अधिक मोकळेपणाने वावरताना आढळतात. आर्थिक व्यवहारातही उत्तरेपेक्षा दक्षिणेकडे स्त्रियांचा सहभाग अधिक आहे.

## वर्णव्यवस्थेचे परिणाम

हिंदू समाजातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेचाही स्त्रियांच्या परिस्थितीवर परिणाम झालेला आहे. ब्राह्मण हे मुख्यतः आर्य संस्कृतीचे वाहक, सोवळयाओवळयाच्या त्यांच्या कल्पनांमुळे स्त्रिया पौरोहित्य करण्यास अनाधिकारी मानल्या जात. संस्कृत विद्येचा त्यांना अधिकार नव्हता. त्यामुळे अर्थार्जनाच्या कार्यात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होणे त्यांना शक्य नव्हते. क्षत्रिय अथवा लढाऊ वर्ग सर्वत्रच स्त्रियांना अबला मानून काबूत ठेवणारा. त्यामुळे उच्चवर्णीय स्त्रियांची स्थिती मध्ययुगात इतर वर्णातील स्त्रियांपेक्षा अधिक शोचनीय झाली. सती, केशवपन, सक्तीचे वैधव्य अशा जाचक रूढी त्यांच्यावर लादल्या गेल्या. शेतकरी व कामगार वर्गातील स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने त्यांच्या व्यवसायात सहभागी होत. स्त्रीपुरुष या दोघांनाही शिक्षणाचा अधिकार नसल्याने शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टया त्यांच्यामध्ये फार तफावत नव्हती. म्हणून कौटुंबिक जिवनात उच्चवर्णीय स्त्रियांइतकी कुचंबणा त्यांना सहन करावी लागली नाही.

इंग्रजी राजवटीत उच्चवर्णीय पुरुषांवर इंग्रजी शिक्षणाचे प्रथम संस्कार झाले; आणि त्यांची राहाणी व विचारसरणी यांत बदल होऊ लागला. पूर्वीपासून शिक्षणाला वंचित झालेल्या स्त्रिया मात्र मनाने मध्ययुगातच वावरत होत्या. त्यामुळे जुन्या कुटुंबव्यवस्थेत सुशिक्षित उच्चवर्णीय तरुणांची फार ओढाताण होऊ लागली. इंग्लंडमधील उदारमतवादी तत्त्वचिंतक स्टुअर्ट मिल यांना हे सुशिक्षित गुरुस्थानी मानीत. मिल यांचा 'स्त्रियांची परवशता' हा ग्रंथ त्यांच्या वाचनात आल्याने भारतातील उच्चवर्णीय स्त्रीयांच्या दुःस्थितीकडे त्यांचे लक्ष गेले. ख्रिस्ती धर्मोपदेशक सती, बालहत्या, केशवपन, बालविवाह इत्यादी दुष्ट चालींविरुद्ध जनमत तयार करीत होते. स्त्रीशिक्षणासाठी त्यांनी शाळाही काढल्या होत्या. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन आपल्याकडील सुधारकांनी स्त्री-दास्यविमोचनाच्या प्रश्नाला चालना दिली. त्यांनी स्त्रियांसाठी शाळा काढल्या. पुनर्विवाह लावले; आणि विवाहाची वयोमर्यादा वाढविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांची फळे उच्चवर्णीय स्त्रिया आज चाखीत आहेत. उच्चवर्णीय स्त्रियांमधील शिक्षणाच्या प्रसारामुळे आज अनेक स्त्रिया नोकरीत व व्यवसायात पुरूषांची बरोबरी करू शकतात. दास्यमुक्त स्त्रियांमध्ये बव्हंशी त्यांचाच भरणा आहे.

## पुरुषप्रधान कुटुंबपद्धती

स्त्रियांच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण आपली पितृप्रधान कुटुंबपद्धती हे होय. महाभारताच्या काळापासून आतापर्यत भारतामध्ये ही कुटुंबपद्धती अव्याहत चालू आहे. या कुटुंबपद्धतीत कर्त्या पुरूषाच्या हातात कुटुंबातील सत्तेचे केंद्रिकरण झालेले असते. कुटुंबाच्या अचार विचाराचे नियम त्याने घालून दिलेले असतात. कुटुंबातील माणसांचे खाणेपिणे, कपडेलत्ते यापासून तो शिक्षण, विवाह, व्यवसाय धर्मकृत्ये याबद्दलचे सर्व निर्णय त्यानेच घ्यावयाचे असतात. अशा व्यवस्थेत कुटुंबातील प्रौढ स्त्रिया घेतल्या तरी त्यांचा दर्जा नेहमी दुय्यम असतो. शिवाय कुटुंबातील नात्याच्या उतरंडीप्रमाणे प्रत्येक स्त्रिच्या दर्जात फरक पडत जातो मध्ययुगातील एकत्र कुटुंबाचे जीवन मुख्यतः शेतीवर अवलंबून होते. स्त्रियांकडे शेतजमीनीची मालकी नसल्याने त्यांचा उत्पन्नावरही अधिकार नव्हता. इतकेच नव्हे तर जमिनीप्रमाणे स्त्रीही सृजनशील असल्याने या क्षेत्राचे परबीजापासून संरक्षण करणे ही देखील कुटुंबप्रमुखाची एक प्रमुख जबाबदारी मानली जाई. साहजिकच अपत्यधारणेची क्षमता असणाऱ्या तरुण स्त्रियांवर अधिक बंधने लादली जात.

उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर एकत्र कुटुंबव्यवस्थेचा ऱ्हास होऊन कुटुंबातील इतर माणसांच्या जाचापासून स्त्रीची मुक्तता झाली. परंतु शिक्षण, विवाह, व्यवसाय याबाबतीत निर्णयाचे स्वातंत्र्य तिला प्राप्त झाले आहे असे म्हणता येत नाही. पितृप्रधान कुटुंबसंस्थेत श्रमांची विभागणी अत्यंत काटेकोरपणे केलेली असते. घरकाम आणि अपत्य संगोपन ही पूर्णपणे स्त्रियांची जबाबदारी तेथे मानली जाते. गेल्या काही वर्षात महागाईमुळे मध्यमवर्गीय कुटुंबांची जी आर्थिक ओढाताण झाली तिच्यामुळे स्त्रियांच्या अर्थार्जनाला असलेला कुटुंब-

प्रमुखांचा विरोध कमी झाला व घराबाहेर पडून नोकरी करण्याची स्त्रीला परवानगी मिळाली. स्वतः अर्थार्जन करणाऱ्या स्त्रिया स्वतः थोडाफार खर्चही करु लागल्या मात्र स्त्रियांच्या व मुलाबाळांच्या जीवनातील बहुतेक सर्व निर्णय पुरुषानेच घेतले पाहिजेत अशी सार्वत्रिक समजूत आहे. शिवाय स्त्रिया घराबाहेर पडल्या म्हणून त्यांच्यावरील गृहव्यवस्थेची जबाबदारी कमी होत नाही उलट बाहेरील कामे करण्याची त्यांची क्षमता दिसून येताच जुन्या परंपरेने पुरुषांच्या वाट्याला आलेली अनेक कंटाळवाणी वेळखाऊ कामे त्यांच्यावर ढकलून पुरुष स्वतःच्या व्यवसायात गर्क राहतात. या कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या साखळ्यांमुळेच स्त्रिया आर्थिक क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने घोडदौड करू शकत नाहीत.

## संपत्तीच्या मालकीचा अभाव

आधुनिक जगात संपत्तीची मालकी हे उत्पन्नाचे व प्रतिष्ठेचे एक प्रमुख साधन आहे. जुन्या अर्थव्यवस्थेत स्त्रियांना मालकीचा हक्क नव्हता. आजही स्वतःकडे जमिनीची मालकी असलेल्या स्त्रियांची संख्या अत्यल्प आहे. भारतातील अडुसष्ट टक्के कुटुंबे शेतीवर स्वतःची उपजीविका करतात. शेतकऱ्यांमध्ये लहान शेतकरी व शेतमजूर यांचीच संख्या जास्त आहे. स्त्रियांकडे स्वतःच्या मालकीची जमीन नसल्याने शेतमजूर म्हणूनच त्यांना काम करावे लागते. भारतातील अर्थार्जन करणाऱ्या सर्व स्त्रियांपैकी ५०.४६ टक्के स्त्रिया शेतमजूर आहेत. पुरुषांमध्ये हे प्रमाण फक्त २१ टक्के आहे. भारतातील प्रातिनिधीक कष्टकरी स्त्री ही शेतमजूर स्त्री होय. खेड्यातील परंपरागत श्रमविभागणीप्रमाणे लावणी, कोळपणी, कापणी अशी ठराविक कामेच स्त्रियांच्या वाट्याला येतात. ही कामे हलकी समजली जात असल्याने त्यांची मजूरी कमी असते. शिवाय शेतातील लोकसंख्येच्या वाढीबरोबर स्त्रीमजूरांची संख्या वाढत जाते. त्यामानाने श्रमाची मागणी वाढत नाही. त्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये रोजगारीचे प्रमाण कमी आहे. पैशाची नड आणि श्रमाची तयारी असूनही शेतमजूर वर्गातील बहुसंख्य स्त्रिया बेकारीनें व दारिद्र्याने ग्रासून गेलेल्या आहेत.

शेतमजूर स्त्रियांचे काम कष्टाचे व कमी मजरीचे असल्यामुळे समाजात त्याला प्रतिष्ठा नसते. म्हणून कुटुंबाचे उत्पन्न वाढत गेले की कुटुंबातील स्त्रियांच्या शेतातील श्रमांचे प्रमाण कमी होत जाते. खेड्यातील सुखवस्तू कुटुंबातील स्त्रीला अर्थार्जनाची इतर साधने उपलब्ध नसतात त्यामुळे गृहकृत्यातच ती अडकून पडते. शिवाय आर्थिक स्थिती सुधारली की सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्यासाठी उच्च वर्णियांचे अनुकरण करण्याची बहुतेक कनिष्ट जातींची प्रवृत्ती असते. त्यामुळे स्त्रियांवर अधिक बंधणे घातली जातात. म्हणून खेड्यातील कोणत्याच वर्गातील स्त्रीला स्वतःचा विकास करून घेण्यास आजच्या समाजव्यवस्थेत फारसा वाव मिळत नाही.

## भांडवलसंचयाची अक्षमता

औद्योगीकरण ही आर्थिक विकासाची गुरुकिल्ली मानली जाते. आधुनिक उद्योगधंद्यांची वाढ भांडवलसंचयावर अवलंबून असते. फार पूर्वीपासून स्त्रियांकडे संपत्तीची कधीच मालकी नसल्याने आणि अर्थार्जनाचीही त्यांना संधी नसल्याने स्त्रियांपाशी भांडवलाचा अभाव असतो. म्हणून कुठल्याही क्षेत्रात आधुनिक तंत्राचा व भांडवलाचा प्रवेश झाला की स्त्रिया त्यातून बाहेर फेकल्या जातात. शहरात भाजी, मासे, गवताच्या किंवा लाकडाच्या मोळ्या विकून अनेक बायका आपली उपजिविका करतात. पण संघटित बाजारपेठेत स्त्रिया दुकानदार म्हणून आढळत नाहीत. इतकेच नव्हे तर खादी–ग्रामोद्योग संघासारख्या सरकारी अथवा निमसरकारी संस्था सोडल्या तर इतर दुकानात नोकर म्हणूनही स्त्रियांची वर्णी लागत नाही. असंघटित उद्योगातील अनेक कामे घरबसल्या करता येतात. त्यामुळे विड्या वळणे, काजूबिया सोलणे, सूत काढणे अशी कामे करून स्त्रिया कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावतात. असंघटित उद्योगातील या स्त्रीकामगारांना कामगार संघटनांचे संरक्षण मिळत नाही. सरकारी कायदे त्यांच्यापर्यंत जाऊन पोचत नाहीत.

कामाची चुकीची मोजणी, मजुरीचे अत्यल्प दर, मजुरीतील अनधिकृत कपात अशा नाना मार्गांनी या उद्योगात स्त्रियांची पिळवणूक केली जाते. उपासमारीच्या भीतीने यातील अनेक स्त्रिया मालकांनी केलेली स्त्रीत्वाची विटंबनाही सहन करतात. शिवाय असंघटित उद्योगात पुरेसा भांडवलसंचय झाला की श्रमाऐवजी यंत्राचा वापर केला जातो आणि श्रम शक्तीची मागणी घटत जाते. मोठया कारखान्यांच्या स्पर्धेमळेही लहान उद्योगांचा ऱ्हास होतो; आणि अशा उद्योगात काम करणाऱ्या शेकडो स्त्रिया बेकार होतात.

## तांत्रिक शिक्षणातील भेदाभेद

शहरात राहाण्याची जागा कारखान्यांपासून दूर असते. त्यामुळे लहान मुलांच्या संगोपनाची जबाबदारी असणाऱ्या स्त्रियांना कारखान्यात काम करणे सहसा शक्य होत नाही. परंतु पैशाची चणचण भासू लागली की कच्च्याबच्च्यांची कशीबशी सोय करून विवाहित स्त्रियाही कारखान्यात काम करण्यास प्रवृत्त होतात. स्त्रियांची मजरी पुरुषांपेक्षा कमी असते. शिवाय लहानापणापासून दडपणात वाढण्यामुळे त्या वरिष्ठांचा जुलूम निमूटपणे सहन करतात. म्हणून कापडाच्या व तागाच्या गिरण्यात पूर्वी शेकडो स्त्रीकामगारांची भरती करण्यात येत असे. या उद्योगात आता यांत्रिकीकरण सुरू झाल्याने नोकरकपात सुरु होऊन स्त्रिया मोठ्या प्रमाणावर रोजगारीला मुकल्या आहेत.

गेल्या तीस वर्षात भारतात पोलाद, यंत्रसामुग्री, इंजिने वगैरेचे उत्पादन करण्याचे जे मोठे उद्योगधंदे अस्तित्वात आले त्यांनी उत्पदनात अद्ययावत तंत्राचा वापर सूरू केला. अशी यंत्रे चालविण्यासाठी थोडयाफार तत्रज्ञानाची आवश्यकता असते. परंतु स्त्रिया यंत्रे चालविण्यास असमर्थ असतात अशी पुरुषांचीच नव्हे तर बहुतेक स्त्रियांचीही समजूत असते. त्यामुळे तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांकडे स्त्रिया सहसा वळत नाहीत. आणि या नव्या उद्योगात त्यांना प्रवेश मिळत नाही. कुशल कामगारांच्या वर्गात स्त्रिया अभावानेच आढळतात.

## बढतीला विरोध

उद्योगधंद्याच्या मानाने सेवा क्षेत्रात स्त्रियांना प्रवेश अधिक सुलभ आहे. वेश्याव्यवसाय हा अत्यंत लाजरवाणा परंतु, स्त्रियांचा फार प्राचीन काळापासून चालत आलेला व्यवसाय आहे. स्वर्गात गेल्यावरही स्त्रियांची त्यातून पूर्णपणे मुक्तता होत नाही अशी हिंदू पुराणकर्त्यांची समजूत आहे. दुसऱ्यांच्या घरी घरकाम करून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांची संख्याही मोठी आहे. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाल्यावर आता शिक्षण, आजाऱ्यांची शुश्रुषा, वैद्यकी या क्षेत्रात स्त्रिया मोठ्या संख्येने प्रवेश करु लागल्या आहेत. अपत्यसंगोपन आणि आजाऱ्यांची शुश्रुषा ही आपल्या कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांची कर्तव्ये मानली जात. म्हणून त्यांना व्यवसायाचे स्वरूप आल्यावर स्त्रियांना त्यात प्रवेश मिळणे स्वाभाविक होते. म्हणून बहुसंख्य सुशिक्षित स्त्रिया सरकारी नोकरी किंवा शिक्षण व शुश्रषा या तीन क्षेत्रातच गेलेल्या आहेत. शिवाय औद्योगिक क्षेत्राच्या मानाने या क्षेत्रात मजुरीचे दर कमी असतात म्हणून नाइलाज झाल्याखेरीज पुरुष या क्षेत्रांकडे वळत नाहीत. मात्र स्त्रियांच्या हाताखाली काम करणे पुरुषांना आवडत नाही. म्हणून व्यवस्थापनात स्त्रियांना सहभागी करून घेण्यास त्यांचा विरोध असतो. मुंबई-पुण्यासारख्या शहरातील महाविद्यालयांमधून आज अनेक स्त्रिया प्राध्यापक म्हणून काम करतात. परंतु केवळ स्त्रियांसाठी असलेली महाविद्यालये वगळली तर प्राचार्य म्हणून स्त्रियांची सहसा नेमणूक केली जात नाही. रयत शिक्षण संस्थेची काही महाविद्यालये या नियमाला अपवाद आहेत. त्याचे श्रेय फुले यांच्या परंपरेस दिले पाहिजे.

डॉक्टर, वकील, लेखपाल या व्यवसायातही अनेक स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कामे करतात. परंतु स्त्री व्यावसायीक क्षेत्रात कितीही हुशार व कर्तबगार असली तरी तिच्या वरील गृहव्यवस्थापनाची जबाबदारी यत्किंचितही कमी होत नाही. घरामध्ये तिला बरोबरीच्या नात्याने वागवून तिच्या कामात सहभागी होण्यास पुरुषांची तयारी नसते. त्यामुळे स्वतःच्या व्यवसायासाठी पुरेसा वेळ देणे तिला परवडत

नाही स्वतःच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ करण्यास तिला पुरेसा वेळ नसतो. घराबाहेर काम करीत असतानाही कौटुंबिक अडचणींचे तिच्या मनावर सतत दडपण राहाते. त्यामुळे आपल्या कार्यावर तिचे लक्ष केंद्रित होत नाही. कौटुंबिक गोष्टींसाठी तिला वारंवार रजा घ्यावी लागते. घरचा व बाहेरचा ताण सहन न झाल्याने अनेक स्त्रियांची प्रकृती बिघडते. म्हणून विशेष जबाबदारीची कामे पत्करण्यास त्या उत्सुक नसतात. म्हणून काही अविवाहीत प्रौढ कुमारिका वगळल्या तर स्त्रिया आपल्या व्यावसायात शिखरस्थानी पोहोचू शकत नाहीत. व्यवसायातील भरभराटीसाठी स्त्रियांना आपल्या नैसर्गिक प्रेरणांचा त्याग करणे भाग पडावे हेच त्यांच्या परवशतेचे लक्षण होय.

## कायद्याचे संरक्षण

अर्थार्जन करणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया शेती व लघुउद्योग यांतच गुंतलेल्या आहेत. असे उद्योग विस्तीर्ण क्षत्रावर पसरलेले असतात. शिवाय प्रत्येक ठिकाणी मालकमजूर संबंध वेगवेगळ्या प्रकारचे असतात. अशा उद्योगात कामगारसंघटना स्थापन करणे फार अवघड असते. शिवाय अत्यंत कष्टाच्या व कमी मजुरीच्या या व्यवसायात फक्त स्त्रियाच प्रवेश करतात. मालकाशी झगडा करण्याची त्यांच्यामध्ये ताकद नसते. कुटूंबात सतत दडपणाखाली वाढल्यामुळे स्वतःच्या हक्कासाठी झगडा करण्याची प्रवत्ती त्यांच्यामध्ये लवकर तयार होत नाही. बाहेरचे काम आटोपल्यावर त्यांची घरकामाची दुसरी पाळी सुरू होत असल्याने संघटनेच्या कार्यात भाग घेण्यास त्यांना सवड नसते. त्यामुळे स्त्रिया बहुसंख्येने असलेल्या व्यवसायात ट्रेड युनियन संघटना सहसा उभ्या रहात नाहीत. या लघुउद्योगांमध्ये स्त्रियांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होते. म्हणून स्त्रियांच्या संरक्षणासाठी कामाचे तास, वेळ, जागा, प्रसूतीची रजा, पाळणाघराची सोय, इत्यादी निश्चित करणारे कायदे शासनाने मंजूर केले. परंतु अशा कायद्यामुळे मालकाचा स्त्रीकामगारांवरील खर्च वाढत जातो, स्त्रीकामगारांच्या संख्येत कपात होते आणि स्त्रियांच्या बेकारीची समस्या अधिकच गंभीर बनते. त्यामधून पिळवणूक की बेकारी असा नवा पेच स्त्रियांसमोर उभा रहातो. स्त्री कामगारसंरक्षक कायद्यांनी स्त्रियांच्या बेकारीत भर पडत असल्याने स्त्रियांनी कायद्याचे संरक्षण मागू नये अशा निष्कर्षाप्रत पाश्चत्य देशातील अनेक स्त्रीसंघटना येऊन पोहोचल्या आहेत.

## राजकीये क्षेत्रातील पिछेहाट

आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांच्या या परिस्थितीमुळे इतर क्षेत्रातही हळूहळू त्यांची पिछेहाट होत आहे. भारतीय प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर १९५२ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे लोकादरास पात्र झालेल्या अनेक महिला निरनिराळ्या पक्षांनी आपल्या उमेदवार म्हणून उभ्या केल्या आणि त्यातील अनेक स्त्रिया विधीमंडळातही निवडून आल्या. गांधीजींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या स्वातंत्र्य चळवळीत विद्वत्तेपेक्षा कृतीला, प्रतिष्ठेपेक्षा चारित्र्याला, पैशा पेक्षा त्यागाला अधिक महत्त्व होते. त्यामुळे शिक्षण आणि संपत्ती यापैकी कशाचेही पाठबळ नसलेल्या काही स्त्रिया समाजसेवेच्या मार्गाने राजकारणात पुढे आल्या. स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुकात या जुन्या कार्यकर्त्यांचा मान राखला गेला. संसदीय लोकशाही येथे स्थिरस्थावर झाल्यावर राजकारणात त्याग, सेवा, चारित्र्य यांचे महत्त्व हळू हळू कमी होत गेले. लोकप्रतिनिधींनी निरनिराळ्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व व संरक्षण करावे अशी अपेक्षा निर्माण झाली. तेव्हा संपत्ती, सत्ता आणि संघटना या सर्व दृष्टींनी दुर्बळ असणाऱ्या स्त्रिया विधीमंडळात प्रवेश करण्यास असमर्थ ठरल्या. स्त्रीपुरुषांमधील साक्षरतेत व शैक्षणिक संधीतही अद्याप फार मोठी तफावत आहे. स्त्रियांच्या खालावणाऱ्या परिस्थितीचे प्रमुख गमक भारताच्या लोकसंख्येतील त्यांचे घटणारे प्रमाण होय. १९०१च्या शिरगणतीप्रमाणे स्त्रियांचे प्रमाण दर हजार पुरुषामागे ९७२ असे होते. १९७१ मध्ये ते १०००:९३० इतके घसरले. आर्थिक, राजकीय व शैक्षणिक अशा सर्वच आघाड्यांवर स्त्रियांची होत जाणारी ही पीछेहाट पाहिली म्हणजे भारतीय राज्यघटनेने दिलेले स्त्रीपुरुषांच्या समानतेचे आश्वासन केवळ कागदोपत्रीच राहाणार की काय अशी भीती वाटल्यावाचून राहात नाही.

प्रा. नलिनी पंडित, मुंबई